आधुनिक विचारांचे
# वर्तमान
बीड । मंगळवार, १ मार्च २०२२ । वर्ष : ४ आपले वृत्तपत्र, आपला आवाज अंक : १७ । पाने : ४ । मूल्य २ ₹

### विशेष संपादकीय

## सिर्फ हंगामा खड़ा करना मेरा मकसद नहीं...



केवळ माजलगावच नव्हे तर संपूर्ण बीड जिल्ह्याच्या सामाजिक क्षेत्रात सय्यद मुजम्मिल पटेल यांचे नाव अग्रस्थानी आहे. अगदी अल्पकाळात सय्यद मुजम्मिल पटेल यांनी जे डोंगरासमान सामाजिक काम उभे केले आहे, त्याला तोड नाही. समाजवादी पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष असलेले सय्यद मुजम्मिल पटेल केवळ २० टक्के राजकारण करतात तर ८० टक्के समाजकारणावर त्यांचा भर आहे. समाजातील शेवटचा घटक अधिकारांपासून, आरोग्य सेवेपासून आणि प्रामुख्याने शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी मुजम्मिल पटेल अहोरात्र जनसेवेसाठी उपलब्ध असतात. कोरोना काळात स्वतंत्र कोविड सेंटर उभारणारे मुजम्मिल पटेल केवळ मुस्लिम समाजच नव्हे तर सर्व समाजांसाठी आदर्शवत उदाहरण आहे. दर्जेदार शिक्षण आणि दर्जेदार आरोग्य सेवा गरीबातील गरीबापर्यंत पोहचली पाहिजे यासाठी मुजम्मिल पटेल यांची सारखी धडधड सुरू असते. मनात कुठलाही स्वार्थ भाव नाही, केवळ समाजप्रती असलेल्या तळमळीतून मुजम्मिल पटेल कार्यरत आहेत. कोरोना काळात तीन महिने कोविड सेंटर सुरू करून रूग्णांना मोफत औषधांसह इतर सुविधाही पुरविल्या. जवळपास शंभर बेडची व्यवस्था मुजम्मिल पटेल यांच्या टीमने केली होती. या कोविड सेंटरमुळे तब्बल पाच ते सहा हजार रूग्णांना थेट लाभ झाला. मुजम्मिल पटेल हे विविध पातळ्यांवर काम करणारे व्यक्तिमत्त्व आहे. कामगारांप्रती त्यांना तळमळ आहे. समाजातील शेवटच्या घटकांच्या कामाला तत्परतेने उभे राहणाऱ्या पटेल यांनी कामगारांचे संघटन बांधले आहे. जवळपास तीन हजार संघटीत कामगार त्यांच्याकडे आहेत. अडीच हजार कामगारांना सेफ्टी कीट वाटप केले आहेत. तर सरकारच्या माध्यमातून मिळणारे अनेक सुविधा, सवलती पटेल यांच्या प्रयत्नांमुळे मिळाले आहेत. अलजमील सेवाभावी संस्थेचे सचिव, जमायत उलमा अर्शद मदनी संघटनेचे माजलगाव शहराध्यक्ष, सनराईज प्रिप्रायमरी इंग्लिश स्कूलचे संचालक, पटेल मोहल्ला क्लिनिकचे संकल्पक अशा विविध भूमिकांमधून दिसणारे मुजम्मिल पटेल केवळ समाजसेवा आपला ध्यास आणि श्वास म्हणून काम करत आहेत. जनसेवा क्लिनिकच्या माध्यमातून समाजातील गरीब घटकांना माजलगाव शहरात आरोग्यसेवा तीही अतिशय नाममात्र दरामध्ये उपलब्ध करून देत आहेत. एकीकडे सामाजिक क्षेत्रातले डोंगराएवढे काम उभे करणारे मुजम्मिल पटेल शाहीनबाग आंदोलनामुळेही महाराष्ट्रभर चर्चेत आले होते. रचनात्मक काम करताना आपल्या अधिकारांसाठीही मुजम्मिल पटेल आवाज उठवताना दिसत आहेत. त्यांच्या कार्याला आणि पुढील वाटचालीला शुभेच्छा देताना कवी दुष्यंत कुमार यांच्या सिर्फ हंगामा खड़ा करना मेरा मकसद नहीं। सारी कोशिश है कि ये सूरत बदलनी चाहिए।। या ओळी आठवतात.







# समाजकारण माझा ध्यास, माझा श्वास

## समाजसेवक मुजम्मिल पटेल यांची ग्वाही



**राजकारणात असूनही समाजकारणाला सर्वोच्च प्राधान्य देणारे समाजसेवक मुजम्मिल पटेल यांनी 'वर्तमान'शी दिलखुलास संवाद साधला. आपण राजकारण करतो मात्र समाजकारण आपल्या जीवनातील ' माझा ध्यास आहे, माझा श्वास आहे' अशी ग्वाही मुजम्मिल पटेल विशेष मुलाखतीत दिली आहे.**



**वर्तमान इंटरव्ह्यू**
**भगीरथ तोडकरी**

आपली कौटुंबिक पार्श्वभूमी सांगताना मुजम्मिल पटेल म्हणाले. खरंतर सामाजिक बांधिलकीचा वसा आणि वारसा मला माझे आजोबा सय्यद नबी पटेल यांच्याकडून मिळाला. जुन्या काळात आजोबांचा मोठा दबदबा होता. माजलगाव नगरपालिकेचे तत्कालीन नगरसेवक तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती म्हणून त्यांची कारकीर्द लक्षवेधी ठरलेली आहे. माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील यांचे अत्यंत विश्वासू म्हणून आजोबांनी काम पाहिलेले आहे. त्यामुळे समाजकारण आणि राजकारणाचा वसा वडिलोपार्जित आहे. त्यामुळे समाजासाठी काम करताना पटेल घराण्याचा वारसा सक्षमपणे पुढे चालवण्याची जबाबदारी माझ्यावर पडलेली आहे. वडील सय्यद जमिल पटेल, बंधू ताजम्मिल पटेल, मामा अलिम पटेल यांची प्रेरणा घेवूनच मी समाजकार्यात स्वतःला झोकून दिले आहे. घरातील वडीलधाऱ्या व्यक्तींच्या ठोस पाठिंब्यामुळे आणि आशिर्वादामुळे मी जे काही करू शकत आहे, किंवा यापुढे करणार आहे. त्यांच्याच पाठिंब्यामुळे करेल, असा विश्वासही पटेल यांनी व्यक्त केला.

आपली शैक्षणिक पात्रता काय? यावर बोलताना पटेल यांनी सांगितले. प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण बीडच्या मिल्लिया संस्थेत झाले. आज सिव्हिल इंजिनिअर ही पदवी आपल्याकडे आहे. आपल्या ज्ञानाचा समाजाच्या भल्यासाठी वापर झाला पाहिजे यासाठी मी शैक्षणिक विकासाला महत्व देणारा सामाजिक कार्यकर्ता आहे. मग आपण शैक्षणिक क्षेत्रात काय काम करत आहात? यासंदर्भात पटेल म्हणाले, शिक्षण हा कोणत्याही समाजाच्या प्रगतीचा मुख्य भाग आहे. ज्या ज्या समाजाने शिक्षणाची कास धरली, तो समाज प्रगती पथावर आहे. मुस्लिम समाजातील शैक्षणिक मागासलेपण माझ्या चिंतनाचा आणि चिंतेचा विषय आहे. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात भरीव काम करण्याच्या उद्देशाने सनराईज प्रिप्रायमरी इंग्लिश स्कूल स्थापन केली आहे. भविष्यात बारावीपर्यंत ऊर्दू माध्यमातील विद्यार्थी-विद्यार्थीना शिक्षणाची दारे उघडे करण्याचा मानस आहे. केवळ प्राथमिक, माध्यमिक शिक्षण देवूनच आम्ही थांबणार नाही तर उच्च शिक्षणासाठी समाजातील गुणवत्ताधारक आणि गरीब विद्यार्थी-विद्यार्थीना पूर्णतः सहकार्य करणार आहोत.

ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन अर्थात एमआयएम या पक्षात कसा प्रवेश झाला? यावर बोलताना पटेल म्हणाले, विद्यार्थी दशेपासून समाजकारणाचे अक्षरशः वेड असल्याने समाजाच्या भल्याची भाषा करणाऱ्या एमआयएमकडे आकर्षित झालो. चार वर्ष जिल्ह्यात तगडे संघटन वाढविले. मात्र गेल्या नगरपालिका निवडणुकीत या पक्ष नेतृत्वाशी मतभेद झाले आणि एमआयएमला सोडचिठ्ठी दिली. मग समाजवादी पार्टीच का जॉईन केली? या प्रश्नाला उत्तर देताना मुजम्मिल पटेल म्हणाले, गेल्या नगरपालिका निवडणुकीत एमआयएमचा असली चेहरा समजल्यानंतर आपल्या समाजासाठी कोणती पार्टी काम करू शकते. हा प्रश्न स्वतःला विचारला आणि अखिलेश यादव यांच्या समाजवादी पार्टीत प्रदेशाध्यक्ष अबू आझमी यांच्या नेतृत्वाखाली समाजवादी पार्टीत प्रवेश केला. समाजवादी पार्टीचे धोरण सर्व समाजांप्रती विकासाचे आहे. विशेषतः अल्पसंख्यांक समाजासाठी राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आबू आझमी लढत आहेत. त्याला बळ द्यावे या उदात्त हेतूने समाजवादी पक्षात आलो, असे त्यांनी प्रांजळ सांगितले. राजकारण हा आपला पिंड नाही. मात्र राजकीय भूमिका मांडण्यासाठी आपण समाजवादी या राष्ट्रीय पक्षात प्रवेश केला आहे.

### 'गरीब घरातील गुणवंत अधिकारी व्हावेत'

मुस्लिम समाज 'कुराणा'च्या आदेशानुसार चालतो. कुराणात इकरा म्हणजे पढ़ असा मराठीत वाचा असा अर्थ होतो. त्यादृष्टीने शिक्षण हेच आपल्या प्रगतीचे प्रमुख माध्यम आहे. त्यादृष्टीने मी आणि माझी टीम प्रयत्न करत आहे. दरम्यान, शिक्षणाबरोबरच विविध स्पर्धा परिक्षा घेवून अल्पसंख्याक बहुजन समाजातील विद्यार्थी-विद्यार्थ्यीनी अधिकारी झाल्या पाहिजेत हा उद्देश आहे. आपले सर्व प्रश्न शिक्षणामुळेच सुटू शकतात. हा दृढ विश्वास असल्याने पुढे काम सुरू आहे. त्यासाठी गुणवंत आणि गरीब विद्यार्थ्यांना सर्वोतोपरी मदत करण्याचे काम करू. भविष्यकाळात पन्नास मुली आणि पन्नास मुले दत्तक घेवून त्यांना उच्चशिक्षित करणे आपले ध्येय आहे, असाही आशावाद पटेल यांनी व्यक्त केले.

आगामी निवडणुकीत समाजवादी पार्टीची भूमिका काय आहे? यासंदर्भात पटेल सांगतात, मी समाजाच्या विकासासाठी कार्य करणारा सामाजिक कार्यकर्ता आहे. २४ तास समाजासाठी उपलब्ध असतो. समाजवादी पार्टीने बीड जिल्हाध्यक्ष पद देवून माझा सन्मानच केला आहे. त्या सन्मानाचा मी आदराच करतो. काम करत राहणे केवळ हेच ध्येय सध्या तरी माझे आहे. मात्र समाजवादी पार्टी जो आदेश देईल तो आपणास शंभर टक्के मान्य राहील. राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव असो की प्रदेशाध्यक्ष आबू आझमी किंवा इतर वरिष्ठ नेतृत्व त्यांच्या आदेशानुसारच जिल्हाभरात व्यापक संघटन उभारू. समाजाच्या कल्याणासाठी पक्षाचे काम याहीपेक्षा वाढवणार आहे, अशीही माहिती पटेल यांनी दिली.

सामाजिक कार्य तुमच्यासाठी काय आहे? हे बघा आपण समाजाचे देणेकरी लागतो याच भावनेतून मी काम करतो. सामाजिक क्षेत्र माझा ध्यासच नाही तर श्वास आहे. त्यामुळे सामाजिक क्षेत्रात काम करतो. प्रेषित मोहम्मद सल्लल्लाहु अलैही वसल्लम म्हणतात त्याप्रमाणे

'दर्दे दिल के लिए पैदा किया इन्सान को,
वरना इबादत के लिए कुछ कम नहीं थे फरिश्ते'

अगदी या ओळीप्रमाणे माझे समाजकार्य सुरू आहे. आपण दुखिःतांचे दुखः, रडणारांची आसवे पुसली पाहीजेत या पलीकडे माझे समाजकार्य वेगळे नाही.

सामाजिक क्षेत्रात लढण्यासाठी तुम्हाला बळ कसे मिळते? यावर बोलताना पटेल म्हणाले, माझ्या कुटुंबातच समाजकार्याचा मोठा वारसा आहे. त्यामुळे कोणतेही कार्य मी मनातून करतो. सामाजिक कार्य पार पाडण्यासाठी माझ्या मते भक्कम साथ आणि आशीर्वादाची गरज आहे. ती साथ आणि आशिर्वाद आजपर्यंत मिळत आले आहे. मी काम करतो त्याला मोठे बळ मिळते. ते माझ्या जवळच्या सहकाऱ्यांमुळे आर.के.ग्रुप ऑफ कंपनीचे सर्वेसर्वा रियाज काझी, सल्लाउद्दीन शेख, सलिम खान यांचे योगदान उल्लेखनीय आहे. यांच्यामुळेच कार्य करण्याची उभारी मिळते, प्रेरणा मिळते. त्याशिवाय डॉ.जकी बाबा आणि माझे काका सय्यद खलील पटेल हे माझ्यासाठी प्रेरणास्थान राहिलेले आहेत. आजवरचा प्रवास या सर्वांच्या साथीमुळे यशस्वी होत आला आहे. माझ्या सर्व सामाजिक कामाची दखल जमायत उलमा अर्शद मदनीचे लीगल सेल प्रमुख मौलाना गुलजार आझमी यांनी पुरस्कार देवून सन्मान केला आहे. सामाजिक काम करत असताना समाजाच्या पलीकडे जाऊन काम केले आहे. त्याची घेण्याची गरज आहे. मराठा क्रांती मोर्चाच्यावेळी चौकाचौकात पिण्याच्या पाण्याची सोय केली होती. तर काही ठिकाणी चहा, नाष्ट्याची सोय देखिल केली होती, अशी माहिती पटेल यांनी दिली.

आपले भविष्यकालीन संकल्प काय आहेत? यावर बोलताना पटेल म्हणाले, मी शिक्षण आणि आरोग्य क्षेत्राला सर्वोच्च प्राधान्य देणारा कार्यकर्ता आहे. त्यामुळे माजलगावात सुपर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्याचा आपला मानस आहे. जेणेकरून एक्स-रे, सिटीस्कॅन आदींसह विविध महागड्या तपासण्या गरीबांना शासकीय दरापेक्षाही अल्प दरामध्ये देण्याचा आमचा संकल्प आहे. ऊर्दू माध्यमाचे बी.यु.एम.एस. युनानी कॉलेज उभारणार आहे. त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. महिलांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी विविध प्रशिक्षणे देवून त्यांचे सक्षमीकरण करणे, यावर भर राहील. जनसेवा क्लिनिकच्या माध्यमातून एक वर्षभरापासून गरजू व गरिब रूग्णांना माफक दरात उपचार केले जात आहेत. यासाठी माझी वैद्यकीय टीम डॉ.अफरोज शेख, डॉ.नेहा शर्मा, सय्यद साद, उमर पटेल, इम्रान बागवान, शेख परवीन आदी अविरतपणे कार्यरत आहेत.

आपले कोरोना काळातील कार्य लक्षवेधी ठरले, याबाबत काय सांगाल? यावर प्रश्नावर बोलताना मुजम्मिल पटेल म्हणाले, केशवराव मंगल कार्यालयात ५५ ऑक्सिजनचे बेड आणि ४५ जनरल बेड असे एकूण शंभर बेड कोविड सेंटरमध्ये होते. जवळपास ५५०० लोकांना या कोविड सेंटरचा लाभ झाला. रूग्णांच्या उपचारासाठी थेट मालेगाव येथून ४ डॉक्टरांना पाचारण करण्यात आले होते. याशिवाय माजलगावतील प्रसिध्द डॉ.प्रकाश आनंदगावकर हेही रूग्णांची तपासणी आणि मार्गदर्शन करत होते. कोरोना काळात मदतीपेक्षाही रूग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना आधार देण्याची खरी गरज होती. ती देण्याची काम मी आणि माझ्या टीमने केले एवढेच मी सांगू शकतो.

# मुजम्मिल पटेल : जीना इसिका नाम है



**वर्तमान स्पेशल**
**बाबा श्रीहरी देशमाने**

किसी की मुस्कुराहटों पे हो निसार
किसी का दर्द मिल सके तो ले उधार
किसी के वासते हो तेरे दिल में प्यार
जीना इसी का नाम है

या कवी शैलेंद्र यांच्या काव्य पंक्तीप्रमाणे माजलगावच्या मुजम्मिल पटेल यांचे जगणे आहे. २४ तास जनतेच्या हाकेला धावून जाणारा हा समाजसेवक मोहल्यातील मसिहा ठरत आहे. त्याचे कारणही सरळ आहे. कुणाकडून कसलीच अपेक्षा न करता स्वखर्चाने या अफलातून समाजसेवकाने सामाजिक विश्व साकारले आहे. सिव्हील इंजिनिअर असताना मुजम्मिल पटेल नोकरीत न अडकता समाजकार्याला वाहून घेतलेले अफलातून रसायन आहे. जनसेवा क्लिनिकच्या माध्यमातून गेल्या वर्षभरापासून गरीबांना सरकारी रूग्णालयाच्या तुलनेने अत्यल्प दरात सेवा दिली जात आहे. एकीकडे केवळ राजकारणासाठी आणि प्रसिद्धीसाठी चमकोगिरी करणारे कार्यकर्ते, नेते आणि दुसरीकडे मुजम्मिल पटेल सारखा समाजभान जपणारा युवा नेता लंगड्यांचा पाय, आंधळ्यांची काठी बनत चालला आहे. यामागचे एकमेव कारण म्हणजे पटेल यांची समाजाप्रती असलेली तळमळ. कोरोना काळात शंभर खाटांचे कोविड सेंटर सुरू करणे. मुजम्मिल पटेल यांच्यासाठी दिवास्वप्न होते. मात्र त्यांच्या हिमतीला, धडपडीला दाद दिली पाहिजे. आंदोलनापेक्षा रचनात्मक कार्याला मुजम्मिल पटेल प्राधान्य देतात. भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो प्राशण तो गुरगुरल्याशिवाय रहाणार नाही. हाच संदेश मुजम्मिल पटेल आपल्या समाजाला देतात. शिक्षण हे सर्वात प्रभावी शस्त्र आहे. त्यामुळे त्याच मार्गाने चला आणि तीच आपल्या कल्याणाची दिशा आहे. असे ठासून सांगणारे मुजम्मिल पटेल म्हणूनच मुस्लिम समाजातील एक वेगळे व्यक्तिमत्त्व म्हणून पुढे येत आहेत. माजलगावातील एका मोहल्यापासून समाजप्रबोधना बरोबरच मदतीचा हात देणारा युवा नेता सर्वांच्या गळ्यातील ताईत का बनत चालला आहे. याची उत्तर कोरोना काळात ५५०० रूग्णांना उपचार दिले त्यातून मिळते. आरसीसी बांधकाम मजूर संघटनेच्या माध्यमातून तब्बल एक हजार पाचशे कामगारांना मोफत सुरक्षा कीट वितरीत केले. आज मुजम्मिल पटेल यांच्या संस्थेकडे दोन हजार ५०० कामगारांची नोंदणी आहे. केवळ नोंदणी करूनच मुजम्मिल पटेल थांबले नाहीत. तर शेकडो कामगारांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी आवाज दिला. कामगारांच्या मुलींच्या लग्नासाठी, मुला-मुलींना शिष्यवृत्ती असो की महिलांची प्रसूती सरकारकडून मिळणाऱ्या सर्व सुविधा मिळवून देण्यासाठी मुजम्मिल पटेल यांची तळमळ लक्षात घेण्यासारखी आहे. मराठा क्रांती मोर्चाच्या काळात माजलगाव शहरातील चौकाचौकात मोर्चेकऱ्यांना शुध्द पाणी आणि काही ठिकाणी चहा, नाश्ताची सोय केली. यावरून मुजम्मिल पटेल यांचे कार्य जात, पंथ आणि धर्माच्या पलीकडे गेलेले आहे. हे अधोरेखित करण्यासारखे आहे. राजकारणाच्या पलीकडे दुखिःतांची आसवे पुसणारा एक झिंदादिल समाजसेवक पुढे येत आहे. त्याला मनापासून शुभेच्छा दिल्या पाहिजेत.



## संपादकीय

### लालपरीच्या सारथींनी न्याय कधी?

एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या काही अंशी मान्य झाल्या असल्या तरी विलीनीकरणाचे भिजत घोंगडे पडून आहे. एसटी महामंडळाचे राज्य सरकारच्या सेवेत विलीनीकरणाच्या मागणीसाठी राज्यभरातील लाखो एसटी कर्मचाऱ्यांनी २९ ऑक्टोबरपासून संप पुकारला आहे. संप मोडून काढण्यासाठी एसटी महामंडळाने कर्मचाऱ्यांचे निलंबन, सेवासमाप्ती, बडतर्फीची कारवाई केली. काही प्रमाणात वेतनवाढही दिली. याशिवाय मेस्मा लावण्याचा इशाराही दिला. प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून खासगी प्रवासी वाहतुकीमार्फत सेवा देण्यास सुरुवात केली. तरीही कर्मचाऱ्यांनी संप पूर्णपणे मागे घेतलेला नाही. राज्यभरातील एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत मुंबई उच्च न्यायालयात सध्या सुनावणी सुरू आहे. मंगळवारी झालेल्या सुनावणीवेळी एसटी महामंडळाचे राज्य सरकारमध्ये विलीनीकरण करण्यासंदर्भातला अहवालही कोर्टात सादर करण्यात आला होता. एक मुद्दा सोडला, तर इतर सर्व मागण्या मान्य झाल्याची माहिती सरकारी वकिलांनी कोर्टात दिली आहे. विलीनीकरणाबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समितीच्या अहवालावर मुख्यमंत्र्यांचा अभिप्राय असल्याचे सांगण्यात आले आहे; परंतु त्यांची स्वाक्षरी त्यावर दिसत नाही, मग हा त्यांचाच अभिप्राय आहे, हे कसे मानायचे, त्यामुळे काही तरी पुरावा कोर्टासमोर यायला हवा, असे निरीक्षण मुंबई हायकोर्टाने नोंदवले. त्यामुळे एसटी संपाबाबतची पुढील सुनावणी आता शुक्रवारी, २५ फेबुवारी रोजी होणार आहे. एसटी विलीनीकरणाचा प्रश्न न्यायप्रवीष्ट आहे. त्यामुळे केवळ कर्मचारी नव्हे, तर एसटी सेवेवर अवलंबून असलेल्या प्रत्येकाला सुनावणीची उत्सुकता लागून आहे. मात्र राज्यात अस्तित्वात असलेल्या ठाकरे सरकारला विलीनीकरण नको आहे. एसटी कर्मचाऱ्यांचा संप आणि त्यानंतरच्या न्यायालयीन लढाईला मिळून जवळपास ११८ दिवस झालेत. कुठल्याही कर्मचारी संघटनेचा प्रदीर्घ लांबलेला हा पहिलाच संप असावा. संपाच्या पहिल्या दिवसापासून कालपर्यंत परिवहनमंत्री अनिल परब यांनी कर्मचाऱ्यांना केवळ कामावर परतण्याचे आवाहन केले आहे. त्यासाठी थोडी फार पगारवाढीची लालूच दाखवली. मात्र तीनचाकी आघाडी सरकारवर कर्मचाऱ्यांचा विश्वास नाही. पोकळ आश्वासने देणाऱ्या ठाकरे सरकारचा बेजाबदारपणा मंगळवारच्या सुनावणीदरम्यानही दिसून आला. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समितीच्या अहवालावर मुख्यमंत्र्यांचा अभिप्राय असल्याचे सांगण्यात आले आहे; परंतु त्यांची स्वाक्षरी नाही, मग हा अभिप्राय मुख्यमंत्र्यांचाच आहे, हे कसे मानायचे, त्यामुळे काही तरी पुरावा कोर्टासमोर यायला हवा, असे निरीक्षण हायकोर्टाने नोंदवले. राज्याचे परिवहनमंत्री हे वकील (ॲडव्होकेट) आहेत. त्यांच्या नजरेतून ही गोष्ट सुटावी, याचे आश्चर्य वाटते. खात्याचा मंत्री म्हणून अनिल परब यांनी प्रत्येक गोष्टीमध्ये गांभीर्यपूर्वक पाहण्याची गरज आहे. मात्र परब यांच्यासह ठाकरे सरकारला एसटी कर्मचाऱ्यांशी देणे-घेणे नाही. एसटी विलीनीकरणाचा निर्णय अद्याप झाला नसल्याची माहिती राज्य सरकारने उच्च न्यायालयाला दिल्याचे मंगळवारच्या सुनावणीतून पुढे आले आहे. एकूणच प्रत्यक्ष लढाईत आणि न्यायालयीन लढाईदरम्यान ठाकरे सरकारची नाकर्तेपणाची भूमिका कायम दिसते. महाविकास आघाडी सरकारला खासगीकरणाचे वेध लागलेत. मुंबईतील बेस्ट, ठाण्यातील टीएमटी आणि नवी मुंबईतील एनएमएमटीचे खासगीकरण करण्यासाठी प्रयत्न सुरू झालेत. मुंबईत लोकल प्रवासानंतर बेस्ट बसने सर्वाधिक वाहतूक होते. मात्र सध्या बेस्टची अवस्था वाईट आहे. जुन्या एसटी बसेसना भंगारात टाकून त्या जागी छोट्या एसी बसेस आणल्यात. हे कॉन्ट्रॅक्ट आघाडी सरकारमधील एक पक्ष असलेल्या शिवसेनेच्या मंत्र्याच्या कंपनीला दिले गेले आहे. कॉन्ट्रॅक्ट कुणाला मिळाले, यापेक्षा किती वाईट सेवा दिली जाते, याबाबत थोडे विस्तृत सांगावे लागेल. या बसेसमध्ये कंडक्टर नसतो. त्यामुळे आधी प्रवासी बसवले जातात. त्यानंतर पुढे काही थांब्यांवर उभे असलेले वाहक तिकीट काढतात. ग्राऊंड बुकिंग म्हणजे प्रवास सुरू करण्याच्या जागी तिकीट दिले जात असले तरी अशी सुविधा फार कमी आहे. यामुळे प्रवासाचा कालावधी वाढतो आहे. खासगी ड्रायव्हर पूर्णपणे प्रशिक्षित नाहीत. सातत्याने हॉर्नच्या वापरामुळे आवाजाचे प्रदूषण वाढत आहे. वारंवार ब्रेकचा वापर केला जात असल्याने बसमध्ये उभे राहून प्रवास करणे जिकिरीचे होऊन बसले आहे. हा केवळ ट्रेलर आहे. सांगायचा मुद्दा आहे की, खासगीकरणाच्या गोंडस नावाखाली चांगल्या सोयी-सुविधा पुरवण्याचे गाजर दाखवणाऱ्या ठाकरे सरकारचे पितळ पूर्णपणे उघडे पडले आहे. मुंबईतील बेस्ट व्यवस्था तुम्ही नीट सांभाळू शकत नसाल, बेस्ट कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवू शकणार नसाल, तर एसटी कर्मचाऱ्यांनी तुमच्याकडून काय अपेक्षा बाळगाव्यात? मुळात शेकडो कोटी रुपयांचे घोटाळे उघड होणाऱ्या राज्य सरकारला लोकांशी तसेच त्यांच्या समस्यांशी देणे-घेणे नाही. त्यांना आजची गोष्ट उद्यावर टाकून वेळ मारून न्यायची आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाबाबतही ठाकरे सरकारची कायम वेळकाढूपणाची भूमिका राहिली आहे. संपकाळात पन्नासहून अधिक कर्मचाऱ्यांना प्राण गमवावे लागले आहेत. मात्र सरकारला त्याचे सोयरसुतक नाही. कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि थोडे नरमाईचे धोरण म्हणून काही कर्मचारी सेवेत दाखल झाले आहेत. मात्र पुन्हा सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांनाही विलीनीकरण हवे आहे. आमची लढाई ही आता सरकारशी उरलेली नसून ती संविधानिक आहे. आमचे एसटीचे हजारो कर्मचारी विलीनीकरणाच्या मागणीसाठी आजही संपात सामील आहेत आणि विलीनीकरण होत नाही तोपर्यंत मागे हटणार नाहीत, असे प्रत्येक कर्मचाऱ्याचे म्हणणे आहे. नरमाईचे धोरण म्हणजे एसटी कर्मचाऱ्यांची संपूर्ण माघार नाही. त्यांच्या मागण्यांचा साकल्याने विचार व्हायला हवा. या सर्व गदारोळात लालपरीच्या सारथींना न्याय कधी मिळणार हा खरा प्रश्न आहे.

# कोरोना वायरसचा अंताच्या दिशेने?

**ओमायक्रॉन वेरियंटच्या झपाट्याने झालेल्या प्रसारामुळे आणि नगण्य मृत्यूंमुळे हा कोरोना वायरस साथीच्या रोगाचा शेवटचा टप्पा आहे, असं म्हटलं जातंय. त्यामुळे भविष्यात कोरोना वायरसची साथ पुन्हा येईल ही शक्यता फारच कमी आहे. कोरोना वायरसमधे अनेक प्रकारचे बदल होऊन जरी तो पुन्हा आला तरी त्यामुळे पुन्हा जग बंद करण्याची गरज पडणार नाही.**

गेल्या दीड-दोन वर्षापासून संपूर्ण जगभरातल्या लोकांच्या मनात घर करून राहिलेला आणि पुन:पुन्हा डोकावणारा प्रश्न म्हणजे कोरोना कधी जाईल?' वास्तविक, या प्रश्नाचं सरळ सरळ उत्तर आहे - कोरोना जाणार नाही.' होय! तो समाजात राहणारच! पण, तो सर्वसामान्य सर्दी आणि खोकल्यामधे बदलून जाईल. या बदलाची सुरवात झाली असून, डेल्टानंतर आलेला कोरोनाचा नवीन प्रकार ओमायक्रॉन हा त्याचाच प्रकार आहे.



ओमायक्रॉनची लाट फेब्रुवारीत

जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात एकाच दिवशी १२ कोटी लोकांना ओमायक्रॉनचा संसर्ग झाला होता. ही संख्या दुसऱ्या लाटेतल्या एका दिवसाच्या पेशंट संख्येच्या दहापट अधिक होती; तर त्याच दिवसाचा मृत्यूचा आकडा मात्र दुसऱ्या लाटेच्या पन्नासपट कमी होता. यावरून दिसतंय की, आपण कोरोनाच्या शेवटाकडे निघालो आहोत. साधारणपणे ज्या दिवशी फक्त कोरोनाच्या संसर्गामुळे कमीत कमी किंवा अगदी नगण्य मृत्यू नोंदवले जातील मात्र पेशंटची संख्या हजारो किंवा लाखो असेल, तेव्हा कोरोना परतीच्या मार्गावर आहे असं म्हणता येईल. जानेवारी २०२२ ते मार्च २०२२ या तीन महिन्यांच्या काळात जगातल्या ५० टक्के लोकांना ओमायक्रॉनचा संसर्ग होऊन गेलेला असेल, असा अंदाज लॅन्सेट' या जगप्रसिद्ध मेडिकल जर्नलमधे वर्तवण्यात आलाय. अमेरिकेच्या सहा राष्ट्राध्यक्षांचे आरोग्य सल्लागार राहिलेले प्रसिद्ध साथरोगतज्ज्ञ डॉ. फुकूची यांच्या म्हणण्यानुसार, जगभरातल्या ओमायक्रॉनचा सर्वोच्च बिंदू फेब्रुवारीमधे येईल आणि त्यांनतर तो हळूहळू कमी होत जाईल. डॉ. फुकूची यांच्या म्हणण्यानुसार, सध्या आपण कोरोनामधून मुक्ती मिळण्याच्या योग्य दिशेने जात आहोत.

वायरस स्थानिक प्रकारात राहील

ओमायक्रॉन वेरियंटच्या झपाट्याने प्रसारामुळे आणि त्यामुळे होणाऱ्या नगण्य मृत्यूमुळे आशा निर्माण झाली आहे की, हा कोरोना वायरस साथीच्या रोगाचा शेवटचा टप्पा आहे. या आशेचा आधारही संसर्गजन्य रोगाच्या इतिहासात आहे. मागच्या शंभर वर्षातल्या मोठ्या महामारीचा विचार केला, तर याच मार्गाने महामारीचा शेवट झाला आहे. संपूर्ण जगभरात संसर्गजन्य परंतु कमी प्राणघातक प्रकारातल्या वायरस लोकसंख्येचा मोठा भाग व्यापतो, तेव्हा तो त्या लोकसंख्येमधे एक व्यापक संरक्षणात्मक छत्र तयार करू शकतो. अशा प्रकारचं तयार झालेलं संरक्षणात्मक छत्र लसीमुळे तयार झालेल्या संरक्षणासारखंच असतं आणि त्यामुळेच तो वायरस स्थानिक प्रकारचा बनतो. एका ठराविक काळानंतर कोरोनाचा वायरस पावसाळ्यात किंवा हिवाळ्यात येणाऱ्या सर्दी-तापाच्या वायरससारखा होईल आणि पुढे त्याची नवीन म्युटेशन येतील; पण ती धोकादायक नसतील. हा बदललेला पण कमी तीव्रतेचा वायरस प्रसारित होत राहील, पण लस आणि सामूहिक संसर्गाच्या परिणामामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढल्यामुळे संक्रमण कमी होईल, गंभीर आजार आणि मृत्यू फार कमी होतील आणि जीवन महामारी पूर्वीच्या सामान्य स्थितीत परत येऊ शकेल.

कोरोनापूर्वी, कोरोनानंतरचं जग

कोरोनाची साथ सुरू झाल्यापासून प्रत्येकाच्या मनात हा प्रश्न साचून राहिला आहे. गेले दोन वर्ष झाले याचं उत्तर सापडलं नाही. पण आपल्याला आठवत असेल, तर कोरोनाच्या साथीची सुरवात झाल्यापासून अनेक देशातले शास्त्रज्ञ सांगत होते की, आपलं आयुष्य आणि हे संपूर्ण जग दोनच भागात विभागलं जाईल. एक म्हणजे कोरोनापूर्वीचं आणि कोरोनानंतरचं जग. आपण आपल्या कोरोनापूर्वीच्या जगात आहे तसे जाऊच शकत नाही किंवा हे जग पुन्हा पूर्वीसारखं होणारच नाही. गेल्या दोन वर्षात आपल्या आयुष्यात आणि संपूर्ण जगाच्या दैनंदिन व्यवहारात अनेक बदल झालेत. यातले अनेक बदल कोरोना निघून गेला तरी आहे तसेच पुढे राहतील आणि आपणही त्या बदलांना जुळवून घेतलेलं असेल. सध्या भारतामधल्या तिसऱ्या लाटेची तीव्रता आणि होणारे मृत्यू यांचा विचार केला, तर मार्च महिन्याच्या सुरवातीपासून आपण नॉर्मल दैनंदिन व्यवहाराकडे वळू शकू. साधारणपणे जिथे जिथे ओमायक्रॉनची मोठी लाट आली, त्या सर्व देशांमधे हीच परिस्थिती दिसून आली आहे. ज्या वेगाने ओमायक्रॉनची लाट आली त्याच वेगाने ती ओसरली आहे.

विशेष

डॉ.नानासाहेब थोरात

बदल भविष्यासाठी गरजेचेच

भारतामधेसुद्धा अशाच प्रकारची परिस्थिती राहील. आपली लोकसंख्या जरी मोठी असली तरी दुसऱ्या लाटेच्या दुप्पट ते तिप्पट पेशंट संख्या दिसून येईल; मात्र मृत्यू फारच कमी राहतील. ही परिस्थिती आपल्यासाठी आपलं जीवन पूर्वपदावर येण्यासाठी आशादायी असेल. जीवन जरी पूर्वीसारखं होणार नसलं तरी झालेले काही बदल भविष्यासाठी गरजेचेच असतील. उदारणार्थ, पूर्वी लोक आपल्या वैयक्तिक आरोग्याकडे लक्ष देत नव्हते, घरात किंवा सार्वजनिक ठिकाणच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष करत होते. कोरोनानंतरच्या जगात आपल्याला हे बदललेलं दिसून येईल किंवा सध्या हा बदल दिसून येत आहे. लोक मास्कचा वापर स्वतःहून करतील; ज्यामुळे प्रदूषण, धूळ आणि वातावरणीय बदलामुळे होणारे विषाणूजन्य आजार यांच्यापासून आपलं संरक्षण होईल.

कोरोनाचं पुन्हा आगमन?

कोरोना कधी जाईल, या प्रश्नाइतकाच हासुद्धा प्रश्न तेवढाच महत्त्वाचा आहे किंवा विचार करायला लावणारा आहे. आपल्याला साधारणपणे माहीत असलेल्या मागील ५०० वर्षाच्या इतिहासात डोकावून पाहिलं, तर एकाच प्रकारच्या वायरसची साथ पुन:पुन्हा आली नाही किंवा त्या वायरसची साथ जाऊन पुन्हा दहा-वीस किंवा पन्नास-शंभर वर्षानी पुन्हा आली नाही. त्यामुळे भविष्यात कोरोना वायरसची साथ पुन्हा येईल ही शक्यता फारच कमी आहे. समजा, जर कोरोना वायरसमधे अनेक प्रकारचे बदल जरी होऊन जरी तो पुन्हा आला तरी त्यामुळे पुन्हा जग बंद करण्याची गरज पडणार नाही. याचं मुख्य कारण म्हणजे आताच्या कोरोनाच्या साथीत जगातल्या ७० ते ८० टक्के लोकसंख्येला लसीमुळे किंवा कोरोना संसर्ग झाल्यामुळे प्रतिकारशक्ती तयार झाली आहे आणि हीच प्रतिकारशक्ती भविष्यातल्या कोरोनाची लाटसुद्धा सहजच थांबवू शकते. उदाहरणच द्यायचं झालं, तर ज्या लोकांना कोरोनाच्या पहिल्या लाटेत संसर्ग झाला, त्यामधल्या १० टक्के लोकांनाच दुसऱ्या लाटेत पुन्हा संसर्ग झाला आणि त्या लोकांचे मृत्यू मात्र अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतके झाले. ज्या लोकांना पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत कोरोनाचा संसर्ग झाला, त्या लोकांना तिसऱ्या लाटेत कोरोनाचा संसर्ग झालेलासुद्धा समजला नाही आणि अशा लोकांच्या मृत्यूची नोंदसुद्धा सापडली नाही. याउलट या तिन्ही कोरोनाच्या लाटा मात्र बदलून आलेल्या कोरोना वायरसमुळे आल्या. यावरून भविष्यातली परिस्थिती अधिक स्पष्ट होत आहे. जरी कोरोना वायरसमधे नवीन बदल झाले तरी, त्यामुळे अत्यंत जीवघेणी लाट येणार नाही. यामधे कोट्यवधी लोकांना एकाचवेळी झालेला ओमायक्रॉनचा संसर्ग आणि त्याचबरोबर त्यांना दिलेली लस या दोन्हींचा एकत्रित परिणाम आहे.

खरंच कोरोनाचा अंत शक्य?

निसर्गाचा एक साधा नियम आहे. निसर्गात जेवढी मोठी वस्तू तेवढी तिचा अंत सोपा असतो. याउलट जेवढी लहान वस्तू तेवढा तिचा अंत अवघड असतो. उदाहरणच बघूया. लाखो वर्षापूर्वी पृथ्वीवर महाकाय असे डायनासोर प्राणी होते, त्याचवेळी पृथ्वीवर वायरस आणि मुंगीही होती. निसर्गातल्या एका घटनेमुळे महाकाय असे डायनासोर प्राणी नष्ट झाले; मात्र लाखो वर्षांनी आजही मुंगी आणि वायरस आहेत. अगदी अलीकडचं उदाहरण द्यायचं झालं तर मानवी हस्तक्षेपामुळे वाघ, चित्ते, हत्ती हे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत; पण मानवाने कितीही हस्तक्षेप केला तरी तो मुंगीला नष्ट करू शकणार नाही. वायरस तर मुंगीपेक्षा लाखो पटींनी लहान आहे. मानव त्याला नष्टच करू शकणार नाही. मग तो कोणत्याही प्रकारचा वायरस असो. जगातून पोलिओ रोगाचे समूळ उच्चाटन झालं आहे असं जरी आपण जाहीर केलं असलं तरी पोलिओचा वायरस कुठे ना कुठेतरी निसर्गामधे आहेच. अशाच प्रकारे कोरोना वायरससुद्धा काही प्राण्यांमधे किंवा मानवी शरीरातच राहू शकतो. याचं अलीकडचं उदाहरण म्हणजे क्षयरोगाचा जिवाणू. क्षयरोग समाजातून संपूर्णपणे नाहीसा जरी झाला नसला तरी त्याचं प्रमाण गेल्या २५ वर्षात कित्येक पटीने कमी झाले आहे. अलीकडच्या संशोधनातून दिसून आलंय की, हा जिवाणू कोट्यवधी लोकांच्या शरीरात निपचिप पडून आहे. मानवाची प्रतिकारशक्ती खूपच कमी होते तेव्हा तो पुन्हा त्रासदायक ठरतो. वायरस इतकी वर्ष मानवी शरीरात निपचिप पडून राहणं शक्य नसतं; पण कदाचित तो इतर प्राण्यांमधे कोणताही त्रास न देता निपचिप राहील अशीही शक्यता आहे. त्यामुळे कोरोनाचा अंत होणारही नाही आणि आणि पुन्हा भविष्यात फक्त याच कोरोनामुळे जग बंद करण्यासारखी परिस्थितीसुद्धा निर्माण होणार नाही. या दोन्ही शक्यता तेवढ्याच बरोबर असतील.

# याद आ रहा है, तेरा प्यार..!

**बप्पीदांची गाणी आणि संगीत हे असंच काहीसं दुय्यम समजलं गेलं. पण बप्पीदांनी त्याकडे लक्ष दिलं नाही. ते पुन्हा पुन्हा नियतीला हरवत राहिले. आज त्यांनी संगीतविश्वाला अलविदा केलंय. चेहरा हरवलेल्या पिढीचे ते संगीतकार होते. त्यांची दुर्लक्षित ओळख उलगडणारी ही समीर गायकवाड यांची फेसबुक पोस्ट.**

एखाद्या माणसाला एकाच फ्रेममधे अडकवून ठेवलं की त्याचे बाकीचे पैलू कधीच नजरेत येत नाहीत. ती व्यक्ती तितक्याच मर्यादित परिघात बंदिस्त होऊन जाते. बप्पीदा याचं उत्तम उदाहरण ठरावेत. बप्पीदांविषयी लिहण्याआधी त्यांनी केलेल्या नियतीच्या पराभवाबद्दल सांगायचंय.



विनोद खन्नाचा कमबॅक

साल होतं १९८७. आपला दोस्त एका खड्ड्यातून वर यायचा प्रयत्न करतोय म्हटल्यावर त्याला हात देणाराच त्याचा मित्र असतो. राज सिप्पींनी त्यांच्या फिल्मी कारकिर्दीत इन्कार'च्या यशातून शिरपेच खोवला. यातलं हेलनचं मुंगळा मुंगळा' गाणं आणि तगडा विनोद खन्ना लोकांच्या मनात ठसला. यशाची चव चाखल्यानंतर दोनेक दशकांनी विमनस्क झालेला विनोद आधी एकांतवासात आणि नंतर रजनीश आश्रमात गेला. राज सिप्पी दुखी झाले. त्यांनी विनोदसाठी आपल्या मनाची कवाडं एखाद्या बेअरर चेकसारखी खुली ठेवली. विनोदचं करियर मातीत गेल्यात जमा होतं. चार वर्ष ओशोंच्या आश्रमात राहून शिष्यत्व पत्करून तो परतला होता. १९८७ मधे राज सिप्पींच्या सत्यमेव जयते'मधून त्याचं कमबॅक होतं. त्याच्या मोठ्या अडचणी होत्या. त्याचं वय होतं एक्केचाळीस वर्ष!

सत्यमेव जयते'ची पार्श्वभूमी

सत्यमेव जयते'साठी विनोदच्या नायिकेचा शोध चालू होता. त्याला फिट बसेल अशी नायिका नव्हती आणि त्याच्यासोबत काम करायला कुणी उत्सुकही नव्हतं. पंचविशी पार केलेली अनिता राज हसत हसत तयार झाली. मुंबईत ड्रेस डिझायनरअसलेल्या अभिनेत्रीला कधीच या शर्यतीत जाता आलं नव्हतं. तिच्या चेहऱ्यावरून तिला खूप ऐकवलं जायचं. जगदीश राजची मुलगी ही ओळख तिला अजून पुसता आली नव्हती. तिच्याच वयाची दुसरी नायिका होती मीनाक्षी शेषाद्री. सत्यमेव जयते'कडून कुणाच्याच फारशा अपेक्षा नव्हत्या. याच सिनेमात आणखी एक अभिनेत्री होती, माधवी. एक दुजे के लिये', अंधा कानून' वगळता हिचा एकही सिनेमा चालला नव्हता. तिला ऑफर्स यायच्या बंद झाल्या होत्या. सत्यमेव जयते'ची अख्खी कास्टिंग पडीक आणि बी ग्रेड म्हणून हिणवली गेलेली होती. कथेतही काही दम नव्हता. सगळे असे दुकानदारी बंद झालेले चेहरे घेऊन राज सिप्पींनी डाव लावला आणि तो यशस्वी झाला. सगळ्यांनाच जणू संजीवनी मिळाली तीही नियतीला हरवून! आपल्या कामासाठी एक छदामही न घेऊन या यशाचा लाभ एका माणसाला बिलकुल झाला नाही तो म्हणजे बप्पीदा! खरं तर, त्यांच्या एका गाण्याने सिनेमा तारला होता तरीही त्यांचं नाव झालं नाही.

प्रासंगिक

समीर गायकवाड

नियतीला हरवणारी कामचलाऊ माणसं

या संपूर्ण काळात जगात आसपास जी माणसं होती ती नियतीला हरवून पुढे आली होती. १९८४ला इंदिराजींची हत्या होऊन राजीव गांधी पंतप्रधान झाले होते. त्यांच्या कालखंडात १९८७च्या दरम्यानच श्रीलंकेत तमिळ इलमच्या उग्रवाद्यांचा विद्रोह शिगेला गेला होता. रशियाचे अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी जगाला ग्लासनोस्त आणि पेरीस्त्रोईकाची नवी परिभाषा दिली होती. ग्यानी झैलसिंग यांच्या जागी वेंकटरमण राष्ट्रपती झाले होते. सगळीकडे एका नव्या आणि स्थिर बदलाच्या समीकरणाचे दिवस होते. अगदी 'सत्यमेव जयते'सारखे आणि अस्तित्वाच्या शोधात असणाऱ्या बप्पीदासारखेच! या चित्रपटातल्या गायकांच्या नावावर एक नजर टाकली तर हे म्हणणं आणखी पटेल. कविता कृष्णमूर्ती, एस. जानकी, शैलेंद्र, मिताली मुखर्जी आणि स्वतः बप्पीदा! एका अर्थाने म्हटलं तर तो काळच कामचलाऊ माणसांचा होता.

ठहराव असलेल्या पिढीचे प्रतिनिधी

देश स्वतंत्र झाला पन्नासच्या दशकात. त्यामुळे त्या पिढीचा ताजाताजा गवगवा आणि थोरवी नव्वदपर्यंत कायम होती. पण स्वातंत्र्योत्तर कालंखंडात सत्तरच्या दशकात जन्मलेली पिढी आज कोणत्याच हिशोबात नाही. नव्या मिलेनियममधे जन्मलेल्या लोकांनी नवी डिजिटल दुनिया बनवलीय तर एकोणीसशे तीस चाळीसच्या क्रांतीपर्वात जन्मलेले लोक आता फक्त आठवणीत उरलेत. मग मधल्या लोकांचं काय झालं? काळाच्या पडद्यावरचं त्यांचं अस्तित्व काय? फारशा अपेक्षा न करता सुखात समाधानात जगलेल्या या पिढीला नियतीशी लढता आले नाही किंबहुना नियतीशी तिचा सामना झालाच नाही. या पिढीच्या आयुष्यात एक ठहराव होता. एक शांत शीतल गती होती. एक समर्पण होतं. मात्र त्यांना कधीच कुणी कसलं श्रेय दिलं नाही. बप्पीदा याचेच एक प्रतिनिधी ठरावेत. त्यांनी काही विशेष, अतिप्रचंड, भन्नाट, लोकप्रिय झालेलं, कालातीत असं संगीत मोठ्या प्रमाणावर दिलं नाही. पण त्यांनी भरपूर हिट गाणी दिलीत. बप्पीदांच्या नावावर जी हिट गाणी आहेत ती बहुतांश एका पठडीतील आहेत. त्यामुळे त्या पलीकडचे बप्पीदा कुणाला दिसले नाहीत आणि त्यांचा कुणी शोधही घेतला नाही.

कुणाच्या गिणतीत नसलेला संगीतकार

मॅटीनीचा सुवर्णकाळ सरत आला होता. अमिताभ जुना झाला होता. नव्या चेहऱ्यांचं आगमन सुखावह ठरत होतं. हे समीकरण जवळपास प्रत्येक क्षेत्रात समोर येत होतं. अशाही अवस्थेत जुनी सागवानी मंडळी तग धरून होती. अनिल कपूर, जॅकी श्रॉफ, गोविंदा यांच्या मर्यादा उघड्या पडल्या होत्या. सगळे एकमेकांना धरून पुढे जात होते. पण विशेष असं काही घडत नव्हतं. कारण ज्याला त्याला शिक्के मारलेले होते आणि जो तो त्या शिक्क्यांना जागून आपली भूमिका सराईतपणे वठवत होता. बप्पीदा याला अपवाद नव्हते. त्यांच्या वाट्याला मख्ख चेहऱ्याचा मिथुनच जास्त असायचा. क्वचित अमिताभ वाट्याला आला, पण जेव्हा हा योगायोग यशस्वी झाला तेव्हा त्यांनी नमकहलाल', शराबी'सारखे उत्तुंग म्युझिकल हिट्स दिलेत. पार्श्वगायकांमधे अतिशय हार्ड टोन असलेला विजय बेनेडिक्ट त्यांच्या हिश्श्यात आला. त्याच्यासाठी पॉप डिस्कोवरून काही ट्युन्स घेतल्या होत्या. उषा उत्थुपच्या करियरचा तो पीक टाईम होता. कल्पना अय्यर आणि पद्मा नारायण यांच्या डान्सिकल वँपनी जादू केली होती. ही सगळी गाणी त्या त्या काळापुरती हिट होती. त्यांचे रिमिक्सही येऊन गेले. पण ही गाणी बप्पीदासारखीच स्वतःच्या ओळखीच्या शोधात भटकत राहिली. सत्तर ते नव्वदच्या दशकातली पिढी आजही जशी स्वतःच्या ओळखीच्या शोधात भटकतेय तसं बप्पीदांचं झालं.




# मायबाप वाचकहो..!

'गाव तिथं वर्तमान' मोहिमे अंतर्गत आमच्या वाचकांना नवं, आकर्षक पॅकेज देण्याचा आमचा मानस आहे. त्यादृष्टीने वर्षभर घरपोच अंक मिळविण्यासाठी केवळ ४९९₹ भरा. अंकासोबतच तुमच्या कुटुंबातील लाडक्या व्यक्तीचा वाढदिवस अधिक द्विगुणीत करण्यासाठी ठराविक आकारातील जाहिरात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल. त्यासाठी वर्तमान तर्फे मोफत जाहीरात कूपन देण्यात येणार आहे. तरी आपण कसलीच संधी न दवडता आमच्या 'गाव तिथं वर्तमान' मोहिमेत सहभागी होण्यासाठी संपर्क साधावा.

गाव तिथं
आधुनिक विचारांचे
वर्तमान

## संधी दवडू नका, सहभागी व्हा!

आधुनिक विचारांचे
**वर्तमान**
आपले वृत्तपत्र, आपला आवाज

कॉर्पोरेट ऑफीस : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड (महाराष्ट्र) ४३११३१
vartmaneditor@gmail.com 9423209823
www.vartmannews.in 7499934141

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार समाजाला तारणारा

## माजी मंत्री बबनराव घोलप यांचे प्रतिपादन



▶ प्रतिनिधी



माजलगाव : सर्वांगीण प्रगतीपासून वंचित राहिलेल्या चर्मकार समाजाला उन्नतीच्या मार्गावर जाण्यासाठी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या 'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा' हा मूलमंत्र चर्मकार समाजाने आत्मसात करण्याची नितांत गरज असल्याचे प्रखड मत राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी समाजकल्याण मंत्री बबनराव घोलप यांनी व्यक्त केले आहे.

संत शिरोमणी रोहिदास महाराज आणि संत कंकैय्या महाराज यांच्या जयंती महोत्सव निमित्ताने राष्ट्रीय चर्मकार महासंघ व जयंती उत्सव समितीच्या वतीने शनिवार, दि.२६ फेब्रुवारी रोजी आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनिय काम केलेल्या व करत असलेल्या मान्यवरांना माजी मंत्री बबनराव घोलप यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याचे उद्घाटन माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे भाजपा नेते रमेशराव आडसकर यांच्या हस्ते करण्यात आले तर अध्यक्षस्थानी माजी मंत्री बबनराव घोलप होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार आर.टी.देशमुख, बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राज्य प्रवक्ते रोहिदास बनसोडे, मराठवाडा उपाध्यक्ष एन.डी.शिंदे उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय समारोपात माजी मंत्री बबनराव घोलप पुढे बोलताना म्हणाले की, ते गेल्या ३० वर्षापासून चर्मकार समाजाला दिशा देण्याचे काम करत असून त्यांच्या मंत्री पदाच्या कार्यकाळात त्यांनी मागासवर्गीयांना आर्थिक प्रवाहात आणण्यासाठी समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून पाच सुतगिरण्या, तीन सहकारी साखर कारखान्यांची उभारणी करण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य केले होते त्यामुळे ते मोठे प्रकल्प आजही उभे आहेत. जयंती उत्सव व पूरस्कार वितरण कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके, युवा बीड जिल्हाध्यक्ष राजेश जाधव यांनी केले तर पुरस्कारमूर्ती राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टीस्टेटचे संचालक

रविंद्र कानडे, छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष मोहन जगताप, वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा संघटक धम्मानंद साळवे, सोलापूरच्या नगरसेविका श्रीदेवी फुलारे, सोलापूर येथील रिपाइंच्या जिल्हाध्यक्ष दिपालीताई कांबळे, अशोक वाडेकर, बालाजी मारगुडे यांना संत रविदास गौरव पूरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार वितरण सोहळा तसेच जयंती उत्सव यशस्वीरित्या साजरा करण्यासाठी सत्यनारायण उनवणे, सुनिल शिंदे, अशोक वाघमारे, सुनिल खंडागळे, गणेश गवळी, रमेश जगताप, प्रसाद वाघमोडे यांच्यासह जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी अश्विन खंडागळे, विजय नरहिरे, दत्ता जाधव, संतोष जाधव, अर्जून पोहेकर, संतोष खंडागळे, दिगंबर कांबळे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अशोक वाडेकर यांनी केले तर आभार सुभाष कांबळे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास बीड, परभणी जिल्ह्यातील राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते आदींसह माजलगाव तालुक्यातील चर्मकार बांधवांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.



### नांदा सौख्य भरे!

माजलगाव : खळवट लिमगाव (ता.वडवणी) येथील अरूण प्रल्हादराव माने यांचे चिरंजीव पत्रकार धनंजय माने आणि कुंदेगाव (ता.वडवणी) येथील लक्ष्मण मारोतीराव जाधव यांची सुकन्या संध्या यांचा शुभविवाह सोमवार, दि.२१ फेब्रुवारी रोजी पार पडला. याप्रसंगी नवदापत्यांना शुभेच्छा आणि आशिर्वाद देण्यासाठी आप्तस्वकीय, नातलग, मित्र परिवार आणि प्रतिष्ठीत नागरिक उपस्थित होते.



धारूर : प्रसिध्द प्रबोधनकार ह.भ.प.जयश्रीताई तिकोंडे यांचा चाटगाव येथे निवासस्थानी सन्मान करताना राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे धारूर तालुका उपाध्यक्ष ऋषीकेश सांगळे समवेत बाळासाहेब सांगळे.












आधुनिक विचारांचे वर्तमान

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.